# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९
२५६०११९०
टेलीग्राफ : 'युनिपुना'
टेलेक्स : १४५ ७७१९ युनीप इन
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ernet.in

गणेशखिंड,पुणे ४११००७

आरक्षण कक्ष
संदर्भ — आरक्षण/४२/२५१७
दिनांक — २६/११/२००९

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

विषय — मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढणेबाबत.
संदर्भ — .शासन पत्र क्र.बीसीसी २००८/प्र.क्र.८९/०८/१६–ब, दि.२४/६/२००९.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मागासवर्गीयांच्या सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याबाबत शासनाने निर्गमीत केलेले उपरोक्त संदर्भीय परिपत्रक माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सोबत पाठवित आहोत, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत — शासन परिपत्रक.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन ....
दिनांक ....
नस्ती क्रमांक ....

मागासवर्गीयांचा सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक :बीसीसी-२००८/प्र.क्र.८९/०८/१६-ब,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २४ जून, २००९.

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन वि.क्रमांक:बीसीसी-१०९५/१६६/प्र.क्र.५९५/१६-ब, दिनांक २१ ऑगस्ट, १९९८, दिनांक ११ सप्टेंबर,१९९८ व दिनांक १० मार्च १९९९.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ व समक्रमांक शासन शुध्दीपत्रक दि.११/१२/२००२.

(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक २/१/२००३

(४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक:असंक-१००१/प्र.क्र.२९(भाग-३)/२००३/वित्तीय सुधारणा, दि. ९ जानेवारी, २००३.

(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक ७/२/२००३

(६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक २६ मार्च, २००३

(७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक २४ जून, २००३

(८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक ७ ऑक्टोबर, २००३

(९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२००२/१३०६/१६-ब, दिनांक १७ मे, २००४.

(१०) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :बीसीसी-२००६/५३०/प्र.क्र.७९/१६-ब, दिनांक ६.५.२००६.

(११) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी-२००६/प्र. १६४/१६-ब, दिनांक २०.३.२००७.

(१२) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी-२००८/प्र. ८९/१६-ब, दिनांक १५.२.२००८.

## शासन परिपत्रक

शासकीय/निमशासकीय सेवा तसेच, मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, जिल्हा परिषदा व शासकीय अनुदान प्राप्त संस्था, सहकारी संस्था, विद्यापीठे व शासकीय उपक्रम इत्यादी आस्थापनेवरील "मागासवर्गीयांची अनुशेषाची रिक्त पदे जोपर्यंत पूर्णतः भरण्यात येत नाहीत. तोपर्यंत मागासवर्गीयांच्या अनुशेष भरती प्रक्रिया सातत्याने सुरु ठेवावी, अशा आशयाच्या सूचना संदर्भाधीन अनुक्रमांक (१२) येथील दिनांक १५.२.२००८ च्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, अनुशेषाची व्याख्या संदर्भाधीन अनुक्रमांक (१) येथील दिनांक १०.३.१९९९ च्या शासन परिपत्रकात स्पष्ट करण्यात आली आहे. तथापि मागासवर्गीयांच्या अनुशेष भरतीबाबतचा आढावा घेण्यात आला असता, अनेक विभाग अदयापही अनुशेषाबाबत साशंक असल्याचे आढळून येत आहे. तसेच, अनेक विभागांना अनुशेषाची म्हणजे संकल्पना अदयाप स्पष्ट नसल्याचे दिसते. तसेच, शासकीय/निमशासकीय सेवा तसेच, मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, जिल्हा परिषदा

व शासकीय अनुदान प्राप्त संस्था, सहकारी संस्था, विद्यापीठे व शासकीय उपक्रम इत्यादी आस्थापनेवरील मागासवर्गीयांचा अनुशेष अद्यापही पूर्णत: भरण्यात आलेला नाही असेही निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

(अ) मागासवर्गीयांच्या अनुशेषाची पदे भरण्याची प्रक्रिया जोपर्यंत मागासवर्गीयांच्या अनुशेषाची रिक्त पदे पूर्णत: भरण्यात येत नाही, तोपर्यंत सातत्याने सुरु ठेवावी. तसेच विशेष भरती मोहिमेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी संवर्गनिहाय अनुशेषाची पदे भरण्याची जाहिरात देणे, परिक्षा व मुलाखती घेणे यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा अशा पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.

(ब) उपरोक्त संदर्भाधीन अनुक्रमांक (१) च्या शासन परिपत्रकानुसार अनुशेषाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे- **सरळसेवा भरती अथवा पदोन्नती यापैकी कोणत्याही मार्गाने पदे भरताना, बिंदूनामावलीनुसार आरक्षित पदावर त्या त्या गटाचा अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास असे आरक्षित बिंदू अनुशेष म्हणून पुढील भरती प्रक्रियेच्या वेळेस विचारात घेणेकरिता पुढे ओढण्यात यावेत. एका विशिष्ट भरती प्रक्रियेची सुरुवात करताना त्यापूर्वी शेवटच्या भरती प्रक्रियेनंतर अशा रितीने पुढे आढण्यात आलेली आरक्षित पदे (Carried forward Reserved Vacancies) म्हणजेच अनुशेष होय.** सदरील अनुशेष सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८.१०.१९९७ च्या शासन निर्णयानुसार त्या त्या संवर्गामध्ये मागासवर्गीयांच्या वेगवेगळया गटांसाठी आरक्षणाच्या विहित टक्केवारीच्या मर्यादेत विशेष भरती मोहिमेंतर्गत पूर्णपणे भरुन काढता येईल. चालू रिक्त पदे (Current Vacancies) नेहमीच्या पध्दतीनुसार बिंदूनामावलीनुसार भरण्यात यावीत असेही सदर शासन परिपत्रकात स्पष्ट केले आहे. तदनुसार मागासवर्गीयांची चालू रिक्त पदे व अनुशेष भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

२. सरळसेवा व पदोन्नतीमधील मागासवर्गीयांच्या अनुशेष व चालू रिक्त पदांचा एकत्रित अनुपालन अहवाल सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रशासकीय विभागाकडे प्रत्येक तीन महिन्यानंतरच्या म्हणजेच मार्च, जून, सप्टेंबर, व डिसेंबर अखेर त्याच्या पुढच्या महिन्यातील पहिल्या आठवडयात पाठवावा, आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांची माहिती संकलित केलला एकत्रित अहवाल या विभागाकडे प्रत्येक महिन्यानंतरच्या पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवडयात सादर करावा व त्याची एक प्रत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र शासन, पुणे यांच्याकडे पाठविण्यात यावी.

३. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार योग्य त्या सूचना विनाविलंब निर्गमित करण्यात याव्यात व त्याची एक प्रत या विभागाकडे पाठवावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००९०७०११२३९४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सु.मो. महाडिक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

प्रपत्र-१११०[१०००-८-२००६]-३.

शासकीय कार्यालयातील मागासवर्गीयांच्या दि.३१.१२.२००७ रोजीची मंजूर पदे, भरलेली पदे, रिक्त पदे व अनुशेष विवरणपत्र (सरळसेवा/पदोन्नती)

विभागाचे नाव -

| गट | सेवाभरती प्रकार | आढाव्या अंती मंजूर पदे | भरलेली पदे | एकूण रिक्त पदे | एकूण रिक्त पदांपैकी खुल्या प्रवर्गाची पदे | एकूण रिक्त पदांपैकी मागासवर्गीयांची चालू आरक्षणाची पदे | एकूण रिक्त पदांपैकी मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे | भरलेल्या पदांचे विगतवारी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | |
| अ | सरळसेवा | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| | पदोन्नती | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| ब | सरळसेवा | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| | पदोन्नती | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| क | सरळसेवा | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| | पदोन्नती | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| ड | सरळसेवा | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| | पदोन्नती | | | | | | | | | | | | | | | | ० | |
| एकूण | सरळसेवा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | पदोन्नती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |

| अनुशेषाच्या रिक्त पदांची प्रवर्गनिहाय विगतवारी | | | | | | | | | चालू आरक्षण च्या रिक्त पदांची प्रवर्गनिहाय विगतवारी | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. | अ.ज. | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | एकूण | अ.जा. | अ.ज. | विजाअ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | एकूण | शेरा |
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| | | | | | | | | ० | | | | | | | | | ० | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |